**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १९ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. गृहमंत्री अमित शाह यांची नागपूर इथं न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठ सुरू करण्याची अधिकृत घोषणा - पालक मंत्री बावनकुळे यांची समाज माध्यमावर माहिती.

2. नागपूर पोलिस ठाण्याबाहेर निदर्शने केल्याच्या आरोपाखाली मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टीचे नेते फहीम खान यांना अटक, शहरातील हिंसचाराशी संबंध असल्या बाबत चौकशी सुरू.

3. छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित स्थळांना जोडणारी भारत गौरव रेल्वे लवकरच सुरु करण्याची रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत घोषणा केली

4. विदर्भाच्या बहुतांश जिल्हयात उद्या आणि परवा वादळी पर्जन्यमानाचा हवामान विभागाचा इशारा.

-----------------------------------

**न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठ**

गृहमंत्री अमित शाह यांनी नागपूर येथे न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठ सुरू करण्याची अधिकृत घोषणा केली आहे. या विद्यापीठामुळे नागपूरच्या शैक्षणिक वैभवात भर पडली आहे. याचा लाभ देशभरातील फॉरेन्सिक सायन्सच्या विद्यार्थ्यांना, संशोधकांना व कर्मचाऱ्यांना होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाभिमुख नेतृत्वात भारत सर्वच पातळ्यांवर आणि विकासाच्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे. हे विद्यापीठ विकसित भारताच्या संकल्पात महत्वाचे योगदान देईल,असा विश्वर नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे हे विद्यापीठ नागपुरात सुरू होत आहे, त्याबद्दल त्यांचे देखील मनापासून आभार, मानत असल्याचे बावनकुळे यांनी म्हंटले आहे. दरम्यान मौख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

समाज माध्यमावर पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे आभार मानले आहे.

----------------------------------

फहीम खान

औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलनानंतर सोमवारी नागपूर पोलिस ठाण्याबाहेर निदर्शने केल्याच्या आरोपाखाली मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी (एमडीपी) नेते फहीम खान यांना अटक करण्यात आली आहे असं  पीटीआय वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.अनेक पोलिस कर्मचारी जखमी झालेल्या हिंसक संघर्षांप्रकरणी आतापर्यंत नोंदवलेल्या सहा एफआयआरपैकी एका एफआयआरमध्ये खान यांचे नाव आहे. दंगल भडकवण्यात खान यांची काही भूमिका होती का, याचा तपास पोलिस करत आहेत, असे एका अधिकाऱ्याने आज  सांगितले.खान यांच्या नेतृत्वाखाली ५० ते ६० जणांचा एक गट सोमवारी गणेशपेठ पोलिस ठाण्याबाहेर बेकायदेशीरपणे जमला होता आणि त्यांनी विश्व हिंदू परिषदेच्या निषेधाविरुद्ध पोलिसांना निवेदन सादर केले होते, असे एफआयआरमध्ये म्हटले आहे.त्यानंतर, खान आणि इतर आठ जण भालदारपुरा भागात गेले जिथे शिवाजी महाराज चौकाजवळ अल्पसंख्याक समुदायातील सुमारे ५०० ते ६०० लोक जमले होते. खान यांना नंतर अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले. खान हा या घटनेचा सूत्रधार आहे का, असे माध्यमांनी  विचारले असता पोलीस आयुक्त सिंगल यांनी हल्लेखोरांची आणि एफआयआरमध्ये नाव असलेल्या व्यक्तींची भूमिका ओळखण्यासाठी तपास सुरू आहे असे सांगितले. "काही नावे समोर आली आहेत. या लोकांची सुरुवातीपासूनच काही भूमिका होती का, त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी होती का किंवा ते  नियोजन करत होते का, याचा तपास पोलिस करतील. या सर्व पैलूंची चौकशी केली जात आहे," असे ते म्हणाले.

----------------------------------

नागपूर संचारबंदी

नागपूर हिंसाचारात सहभागी असल्याच्या आरोपावरून अटक केलेल्या ५१ जणांना पोलिसांनी जिल्हा सत्र न्यायालयात हजार केलं असता न्यायालयानं सर्व आरोपींना येत्या २१ तारखेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे निर्देश दिले. हिंसाचारात गंभीर जखमी झालेल्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. यात ३ पोलीस उपयुक्त, आणि ६ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे, असं पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांनी सांगितलं.नागपूर शहरात ११ पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत आजही कलम १६३ अंतर्गत संचारबंदी लागू

आहे, शहरातल्या १०० पेक्षा जास्त शाळा, महाविद्यालयं बंद ठेवण्यात आली आहेत.दरम्यान आज गृह विभागाच्या प्रश्न आणि सूचना विषयी आज विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदन दिलं. यात त्यांनी नागपुरच्या गुन्हेगारी क्रमांका विषयी माहिती दिली -

*(पहिल्या 10 मध्ये सातव्या क्रमांकावर आपल्याला नागपुर दिसतो पण ते या करता दिसत कि 2016 साली नागपूरमध्ये आपण नागपूर ग्रामीणचे जवळपास 25 टक्के भागा सामील केला. एन सी आर बीच्या डेटामध्ये त्याची लोकसंख्या ते पकडत आणि म्हणून पुढे वाढतात पण संख्या मात्र आपण सेल्सस पकडतो. म्हणजे 2011 चे पकडतो. जर आपण 2011 च्या सेन्ससमध्येच्या भागात लोकसंख्या पकडली. नागपूर शहर हे बावीसावे 24 व्या नंबरवर जात आहेत असा विचार केला.)*

-----------------------------------

महिला पोलिस विनयभंग

नागपूर शहरातील महाल परिसरात परवा दोन गटांमध्ये झालेल्या हिंसाचारादरम्यान, कर्तव्यावर असलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्याचा जमावातील काही लोकांकडून विनयभंग करण्याचा प्रयत्न झाला. या घटनेची तातडीने चौकशी करण्याचे निर्देश पोलीस महासंचालकांना, महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले आहे.

-----------------------------------

सार्वजनिक बांधकाम विभाग + औषधांचा तुटवडा

राज्यातल्या महामार्गांवर दर २५ किलोमीटर अंतरावर शौचालयं उभी करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागानं घेतला आहे. या स्वच्छतागृहांची देखभाल, सुरक्षा आणि स्वच्छता राखण्याची जबाबदारी सेवाभावी संस्था किंवा बचत गटांना दिली जाईल, असं सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. महिला स्वच्छतागृहांची कमतरता असल्याचं सांगत भाजपाच्या चित्र वाघ यांनी ही चर्चा उपस्थित केली होती.दरम्यान ,राज्यातल्या सर्व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा नेमका किती आहे याची माहिती घेण्यासाठी तीन आमदारांची समिती नेमण्याचे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत दिले.

*(सभागृहाची साधारण भावना अशीच दिसते आहे की सरकारी दवाखान्यांमध्ये औषधांचा तुटवडा आहे आणि त्याचा दर्जा पण पाहिजेत असं नाही. त्यामुळे आपण सांगितल्याप्रमाणे एक आमदार, दोन आमदार तीन आमदारांची एक समिती करून*

*त्यांना पॅसिफिकली. या दौरा करून  ज्या हॉलमध्ये कमतरता भासत आहे. आपण संपूर्ण माहिती ही शासनाकडे द्यावी.)*

----------------------------------

**नीलम गोऱ्हे**

**उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यावरचा विश्वासदर्शक ठराव आज विधानपरिषदेत आवाजी मतदानानं मंजूर झाला. यावर बोलू देण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली, सभापतींनी ती फेटाळून लावली. विरोधी पक्षांनी आपली मागणी लावून धरल्यानं सभागृहात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं, त्यामुळे सभापतींनी कामकाज पंधरा मिनिटांसाठी तहकूब केलं.**

----------------------------------

**भारत गौरव रेल्वे**

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित स्थळांना जोडणारी भारत गौरव रेल्वे लवकरच सुरु केली जाईल, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी यासंदर्भातला प्रश्न विचारला होता.दरम्यान अनेक देशांना आपण रेल्वे कोच, लोकोमोटिव्ह निर्यात करत असल्याची माहिती त्यांनी दिली. -**

*(आज हमारे देश से ऑस्ट्रेलिया को मेट्रो के कोचेस एक्सपोर्ट होने लगे। जो लोकोमोटिव और कोचेस के नीचे का जो मैकेनिकल स्ट्रक्चर होता है, उसको बोगी बोलते हैं। कोच है ऊपर नीचे बोगी यानी उसका अंडरफ्रेम यूनाइटेड किंगडम। सऊदी अरबिया फ्रांस, ऑस्ट्रेलिया।इन सब देशों को होने लगा पैसेंजर कोचेस मोज़ाम्बीक बांग्लादेश श्रीलंका लोकोमोटिव जा रहे अब मोज़ाम्बीक, सेनेगल, श्रीलंका, म्यांमार और बांग्लादेश।)*

**भारतीय रेल्वे स्वदेशी निर्मितीवर भर देत असल्याचे ते म्हणाले. दरम्यान आज मंत्रिमंडळ निर्णयामध्ये यूपीआय पेमेंटला चलना देण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय झाले. या निर्णयाची माहिती त्यांनी पत्र  परिषदेत दिली.**

*(वन थाउज़न्ड फाइव हंड्रेड करोड़ रुपीज की ये स्कीम है एंड एस पर थिस स्कीम फॉर ऑल ट्रांसक्शन्स व्हिच आर  पर्सन टु मर्चंट यू स्मॉल मर्चेंट्स के पेमेंट्स होंगे। अप टु टू थाउजेंड रूपीस उसमें कोई ट्रांसक्शन की कॉस्ट नहीं लगेंगी और उनको इन्सेंटिव दिया जाएगा।)*

----------------------------------

**हवामान**

विदर्भात आज सर्वाधिक कमाल तापमान चंद्रपूर येथे 41. 2 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर वाशिम, अकोला, गडचिरोली, वर्धा या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 40° आणि त्या पलीकडे होतं. तर नागपूर इथं आज 39 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. पश्चिमी वाऱ्यांमुळे गेले दोन-तीन दिवस कमाल तापमानात किंचित घट झाली असून उद्या विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

----------------------------------

प्रा. मा. म. देशमुख

इतिहाससंशोधक, प्रा. मा. म. देशमुख यांचे आज नागपुरात निधन झाले. परिवर्तन चळवळीचे आधारस्तंभ प्रा. मा. म. देशमुख यांचे निधन हे शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रासाठी नुकसान आहे. त्यांनी आपल्या लेखणीतून ऐतिहासिक सत्य समाजासमोर मांडले, अनेक गैरसमज दूर केले आणि नव्या विचारांची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या "मध्ययुगीन भारताचा इतिहास" या ग्रंथामुळे समाजात मोठी चर्चा झाली. कांशिरामजी यांचे सोबत बहुजन आंदोलन उभे करण्यात त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून शोक व्यक्त होत आहे.

----------------------------------